Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 24TH NOVEMBER 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८७ चा इंडियन मरीन आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं सन १८८७ चा इंडियन मरीन आक्ट (ज्यास यांत पुढें "सदरहू आक्ट" असें ह्मटलें आहे) सुधारणें योग्य आहे, त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा व सुरवात.

१. (१) ह्या आक्टास सन १८८७ चा इंडियन मरीन आक्ट सुधारण्याबावत सन १८९८ चा आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सन १८८७ चा आक्ट १४ वा, कलम २, पोटकलम (१), रकम (अ), याची सुधारणा.

२. सदरहू आक्टाचें कलम २, पोटकलम (१), रकम (अ), यांत, "इंडियन मरीन सर्व्हिस" ह्या शब्दांच्याबदला "रॉयल इंडियन मरीन सर्व्हिस (हीस यांत "इंडियन मरीन सर्व्हिस" किंवा "मलिका मोआझमांची इंडियन मरीन सर्व्हिस" असें ह्मटलें आहे)" हे शब्द दाखल करावे.

१८८७ चा आक्ट १४ वा, कलम २, पोटकलम (१) याच्या रकमा (ब), (क) व (ड) याच्या बदला नवीन रकमा दाखल करणें.

३. सदरहू आक्टाच्या त्याच कलमाच्या त्याच पोटकलमांत, (ब), (क) व (ड) ह्या रकमांच्या ऐवजीं खालील रकमा दाखल कराव्या त्या येणेंप्रमाणें:—

(ब) "गझेटेड ऑफिसर" याचा अर्थ, जो मनुष्य आपल्या नेमणुकीच्या हुकुमापरत्वें इंडियन मरीन सर्व्हिसमध्यें खालीं सांगितल्यापैकीं एकादा हुद्दा धारण करीत असेल तो मनुष्य, असा समजावा:—

| | |
|---|---|
| कमांडर, | चीफ एंजिनियर, |
| लेफ्टेनंट, | एंजिनियर, अगर |
| सब्-लेफ्टेनंट, | असिस्टंट एंजिनियर. |

(क) "वारंट ऑफिसर" याचा अर्थ, जो मनुष्य आपल्या नेमणुकीपरत्वें इंडियन मरीन सर्व्हिसमध्यें खाली सांगितल्यापैकीं एकादा हुद्दा धारण करीत असेल तो मनुष्य, असा समजावा :—

| | |
|---|---|
| आसिस्टंट सर्जन, | सुतार, |
| गोलंदाज, | कारकून, अगर |

पहिल्या वर्गाचा एंजिन हांकणारा.

(ड) "पेटि ऑफिसर" याचा अर्थ, जो मनुष्य इंडियन मरीन सर्व्हिस-मध्यें खालीलपैकीं कोणत्याही हुद्द्याच्या कामावर असेल तो मनुष्य, असा समजावा :—

| | |
|---|---|
| जनरल मेस स्टुअर्ड, | सुताराचा मेट, दुसरा वर्ग, |
| लास्करांचा मुख्य सारंग, पहिला वर्ग, | सुताराचे हाताखालील नोकर, पहिला वर्ग, |
| लास्करांचा मुख्य सारंग, दुसरा वर्ग, | सुताराचे हाताखालील नोकर, दुसरा वर्ग, |
| लास्करांचा सारंग, पहिला वर्ग, | ड्रेवर, |
| लास्करांचा सारंग, दुसरा वर्ग, | जनरल मेस बटलर, पहिला वर्ग, |
| सुकाणू धरणारा, | जनरल मेस बटलर, दुसरा वर्ग, |
| लास्करांचा तांडेल, पहिला वर्ग, | बबर्जी, पहिला वर्ग, |
| लास्करांचा तांडेल, दुसरा वर्ग, | बबर्जी, दुसरा वर्ग, |
| एंजिन हांकणारा, दुसरा वर्ग, | ताराचा स्टुअर्ड, |
| स्टोकरांचा सारंग, पहिला वर्ग, | भरती ओहटीची पैरवी ठेवणारा, |
| स्टोकरांचा सारंग, दुसरा वर्ग, | कसाब, पहिला वर्ग, |
| स्टोकरांचा तांडेल, पहिला वर्ग, | कसाब, दुसरा वर्ग, |
| स्टोकरांचा तांडेल, दुसरा वर्ग. | पैलट, |
| सुताराचा मेट, पहिला वर्ग, | नकाशाच्या खोलीवरील नोकर, |
| | ठाव घेणारा, अगर |
| | दुभाष्या. |

सन १८८७ चा आक्ट १४ वा कलम ५३, याच्या (१), (२) व (३) पोटकलमांऐवजीं नवीन पोटकलमें दाखल करणें.

४. (१) सदरहू आक्टाचें कलम ५३ याच्या (१), (२) व (३) या पोटकलमां ऐवजीं खालील पोटकलमें दाखल करावीं : तीं येणेंप्रमाणें :—

"५३. (१) इंडियन मरीन कोर्टांत एक अध्यक्ष, आणि दोहोंहून कमी नाहींत किंवा चोहोंहून जास्त नाहींत असे इतर सभासद असले पाहिजेत; हे सभासद, लेफ्टे-नंटच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसावे.

(२) कमांडरच्या इन्साफासाठीं भरलेल्या इंडियन मरीन कोर्टाचा अध्यक्ष कमांडरच्या दर्जाहून कमी नाहीं अशा दर्जाचा असावा, आणि त्या कोर्टाचें काम चालविणाऱ्या अमलदारांपैकीं निदान दोघे तरी कमांडरच्या दर्जाहून कमी नाहीं अशा दर्जाचे असावे.

(३) कलम ५२, पोटकलम (२), याअन्वयें भरविलेलें इंडियन मरीन कोर्ट खेरीजकरून, कमांडरच्या खालील दर्जाच्या कोणत्याही मनुष्याचा इन्साफ करण्यासाठीं

भरलेल्या इंडियन मरीन कोर्टाचा अध्यक्ष, कमांडरच्या दर्जाहून कमी नाहीं अशा दर्जाचा असावा."

(२) सदरहू कलमांत खालील पोटकलमें जास्त दाखल करावीं : तीं येणेंप्रमाणें:—

"(१०) एकाच इंडियन मरीन कोर्टाचें काम चालविणाऱ्या अमलदारांची परस्परांमधील श्रेष्ठता व वरिष्ठपण हीं, अगदीं ताज्या इंडियन मरीन लिस्टामध्यें दाखविलेल्या त्यांच्या श्रेष्ठतेच्या अनुरोधानें ठरविलीं जातील. एखाद्या अमलदाराचा हुद्दा त्याच्या तत्कालीन नेमणुकीपरत्वें वरिष्ठ आहे एवढ्याच कारणावरून त्याला, त्याच्याबरोबर त्या मरीन कोर्टाचें काम चालविणारा जो अमलदार इंडियन मरीन लिस्टामध्यें त्याहून श्रेष्ठ असेल, अशा अमलदारावर श्रेष्ठता किंवा वरिष्ठपणा प्राप्त होणार नाहीं.

(११) इंडियन मरीन कोर्ट भरविणाऱ्या अधिकाऱ्यानें, साध्य असेल तेव्हां, दरेक इन्साफाकरितां, एक जज्ज आडव्होकेट नेमिला पाहिजे; आणि हा जज्ज आडव्होकेट, शक्य असेल तर, जज्ज आड्व्होकेट जनरलच्या खात्याचा एकादा अमलदार असला पाहिजे.

(१२) इंडियन मरीन कोर्ट भरविणाऱ्या अधिकाऱ्यानें प्रोव्हेस्ट मार्शल ह्मणून एका मनुष्याची नेमणूक केली पाहिजे. हा प्रोव्हेस्ट मार्शल, हुकुमाप्रमाणें कैद्यास किंवा कैद्यांस धरण्याबद्दल व त्यास किंवा त्यांस, कायम करणाऱ्या अधिकाऱ्याचा निकाल कोर्ट भरविणारा अधिकारी आपणास कळवी तोंपर्यंत, सुरक्षितपणें अटकेंत ठेवण्याबद्दल जबाबदार राहील."

सन १८८७ चा आक्ट १४ वा, कलम ७०, ह्यानंतर नवीन कलम दाखल करणें.

९. सदरहू आक्टाच्या ७० व्या कलमानंतर खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

पुरवणीचें कलम.

इंडियन मरीन जहाज फुटलें गमावलें, नाश पावलें किंवा पकडलें गेलें तरत्याबद्दल ठराव.

७०. अ. एकादें इंडियन मरीन जहाज फुटलें, गमावलें, नाश पावलें किंवा शत्रूनें पकडलें असतां, त्यावरील नोकरमंडळी पद्धतीप्रमाणें दुसऱ्या एकाद्या इंडियन मरीन जहाजावर पाठविण्यांत येई तोंपर्यंत, किंवा तें फुटल्याच्या, गमावल्याच्या, नाश पावल्याच्या किंवा पकडलें गेल्याच्या कारणाची कोर्ट भरून चौकशी होई तोंपर्यंत, तें इंडियन मरीन जहाजच आहे असें समजलें जाईल.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८८७ चा इंडियन मरीन आक्ट (सन १८८७ चा १४ वा) पसार करण्यांत आल्यानंतर, इंडियन मरीन सर्व्हिसपैकीं गॅझेटेड अमलदारांतल्या कांहींच्या हुद्द्यांचीं नांवें आर्डर इन् कौन्सिलअन्वयें फिरविण्यांत आलीं आहेत, आणि वारंट व पेटि ऑफिसरांच्या हुद्यांच्या नांवांतही कांहीं फेरफार करण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें, मलिका माआझमा ह्यांनीं, मेहरबानी करून, इंडियन मरीन ह्यास रॉयल इंडियन मरीन असें नांव देण्याचें पसंत केलें आहे. ह्या मसुद्याचीं कलमें २, ३ व ४ हीं, हे फेरफार अमलांत आणण्यासाठीं योजिलीं आहेत.

२. राहिलेल्या कलमाअन्वयें सदरहू आक्टामध्यें एक नवीन कलम दाखल करण्याचें योजिलें आहे. ह्या नवीन कलमास सन १८८६ चा नेव्हल डिसिप्लिन आक्ट (२९ व ३० व्हिक्टोरिआ, चाप्टर १०९) ह्याच्या ९१ व्या कलमाचा आधार असून त्यायोगें, एकादें इंडियन मरीन जहाज फुटल्यानंतर, गमावल्यानंतर, नाश पावल्यानंतर किंवा पकडलें गेल्यानंतर त्याच्या संबंधानें शिस्त राखतां येईल.

एड्विन एच्. एच् कॉलेन.

तारीख १९ माहे सप्टेंबर सन १८९८.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## चलनी नोटी व ब्यांकनोटी बनाऊ करण्यासंबंधी कायदा सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी चलनी नोटी व ब्यांक नोटी बनाऊ करण्यासंबंधी कायदा सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९८ चा चलनी नोटी बनाऊ करण्याबाबत आक्ट असें ह्मणावें; आणि — लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो ताबडतोब अमलांत येईल.

२. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या ४८९ व्या कलमानंतर, खालीं दिलेलीं कलमें दाखल करावीं, ह्मणजे:— — सन १८६० च्या ४५ व्या आक्टाच्या ४८९ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करणें.

"चलनी नोटी व ब्यांकनोटी यांविषयीं.

"४८९ अ. जो कोणी कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून (या अधिकाराबदल किंवा सबबीबदल शाबिती करण्याचें काम आरोपितावर राहील), कोणतीहि चलनी नोट किंवा ब्यांकनोट बनाऊ केलेली आहे किंवा नकली आहे असें माहीत असून अगर असें मानण्यास आधार असून ती बनाऊ किंवा नकली चलनी नोट किंवा ब्यांकनोट कोणत्याहि इतर मनुष्याकडून विकत घेईल किंवा घेईल अगर आपल्याजवळ ठेवील त्यास जन्मपर्यंत काळे पाण्यावर पाठविण्याची शिक्षा दिली पाहिजे किंवा त्यास दोहों प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद दहा वर्षेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, व तो दंडासहि पात्र होईल. — बनाऊ केलेल्या नोटा जवळ ठेवणें.

"४८९ ब. जो कोणी कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून (या अधिकाराबदल किंवा सबबीबदल शाबिती करण्याचें काम आरोपितावर राहील)— — चलनी नोटी किंवा ब्यांकनोटी बनाऊ करण्यासाठीं कोणतीहि हत्यारें किंवा साहित्य करणें अगर जवळ बाळगणें.

(अ) खालीं सांगितलेल्या जिनसा ह्मणजे—

(१) कोणतीहि चलनी नोट किंवा ब्यांक नोट करण्यासाठीं उपयोग करावयाच्या कारणाकरितां योग्य अधिकाऱ्याकडून जो कोणताहि कागद मुद्दाम पुरविण्यांत येतो त्या कागदासारखा कोणताहि कागद किंवा इतर पदार्थ, किंवा.

(२) सदरहू प्रकारचा कोणताहि कागद किंवा इतर पदार्थ करण्याचें, अगर सदरहू प्रकारच्या कोणत्याहि कारणाकरितां मुद्दाम पुरविलेल्या कोणत्याहि कागदांत किंवा कागदावर उपयोग केलेले कोणतेहि शब्द, आंकडे, अक्षरें, निशाण्या किंवा रेषा यांसारखे कोणतेहि शब्द, आंकडे, अक्षरें, निशाण्या किंवा रेषा सदरहू प्रकारच्या कागदांत अथवा पदार्थांत किंवा तशा कागदावर अथवा पदार्थांवर काढतां येण्याजोगें कोणतेंहि यंत्र, किंवा हत्यार किंवा साहित्य करील, करण्याची सुरुवात अगर तयारी करील, किंवा वापरील, किंवा जाणूनबुजून आपल्याजवळ बाळगील किंवा त्यांची व्यवस्था करील; किंवा

(ब) ज्यांचा ठसा सर्वांशीं किंवा अंशतः, सदरीं सांगितल्या प्रकारच्या कोणत्याहि दस्तऐवजांत उपयोग केलेले शब्द, आंकडे, अक्षरें, निशाण्या किंवा रेषा यांसारखा असेल असे कोणतेहि शब्द, आंकडे, अक्षरें, निशाण्या किंवा रेषा कोणत्याहि पत्र्यावर किंवा साहित्यावर बठवील किंवा करील; किंवा

(क) ज्याच्यावर असे कोणतेहि शब्द, आंकडे, अक्षरें, निशाण्या किंवा रेषा वठविलेल्या अगर केलेल्या असतील तसा कोणताहि पत्रा किंवा साहित्य वापरील किंवा जाणूनबुजून आपल्याजवळ ठेवील किंवा त्याची व्यवस्था करील; किंवा

(ड) ज्याच्यावर, सदरीं सांगितल्या प्रकारच्या कोणत्याहि दस्तऐवजांतील ठरीव मजकूर सर्वांशीं किंवा अंशतः लिहिलेला किंवा छापलेला असेल तसा कोणताहि कागद किंवा साहित्य वापरील किंवा जाणूनबुजून आपल्याजवळ ठेवील किंवा त्याची व्यवस्था करील;

त्यास जन्मपर्यंत काळे पाण्यावर पाठविण्याची शिक्षा दिली पाहिजे किंवा त्यास दोहों प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, व ती कैद सात वर्षेंपर्यंत ठरविण्याचा अख़्त्यार आहे, व तो दंडासहि पात्र होईल."

सन १८९८ च्या ५ व्या आक्टाच्या २ ऱ्या परिशिष्टांत वाढवावयाचा मजकूर.

३. सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा याच्या २ ऱ्या परिशिष्टांत, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या ४८९ व्या कलमासंबंधी मजकुरानंतर, खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

**चलनी नोटी व ब्यांकनोटी ह्यांविषयीं.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४८९ अ. | बनाऊ केलेल्या नोटी जवळ ठेवणें. | वारंटावांचून धरण्याचा अख़्त्यार आहे. | वारंट. | अख़्त्यार नाहीं. | अख़्त्यार नाहीं. | जन्मपर्यंत काळे-पाण्याची शिक्षा, किंवा दोहों प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारची १० वर्षेंपर्यंत कैद व दंड. | सेशन कोर्टास. |
| ४८९ ब. | चलनी नोटी किंवा ब्यांक नोटी बनाऊ करण्यासाठीं कोणतींहि हत्यारें किंवा साहित्य करणें अगर जवळ बाळगणें. | वरप्रमाणें. | वरप्रमाणें. | वरप्रमाणें. | वरप्रमाणें. | जन्मपर्यंत काळे-पाण्याची शिक्षा किंवा दोहों प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारची ७ वर्षेंपर्यंत कैद व दंड. | वरप्रमाणें. |

**हेतु व कारणें यांचें निरूपण.**

या मसुद्याचा हेतु ह्मटला ह्मणजे चलनी नोटी व ब्यांक नोटी बनाऊ करण्यांत येऊं नयेत ह्मणून जेणेंकरून अधिक चांगल्या रीतीनें ठराव करतां येईल अशा प्रकारें हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा (सन १८६० चा आक्ट ४५) सुधारणें हा होय.

२. चलनी नोटी बनाऊ करण्याच्या बाबती गेल्या थोडक्याच वर्षांमध्यें वारंवार घडून आल्या असल्यामुळें आणि फोटोग्राफीच्या योगानें व कपट करण्याच्याच इराद्यानें चलनी नोटींच्या नकला तयार केल्याचीं कित्येक उदाहरणें अलीकडे घडून आलीं असल्यामुळें हिंदुस्थान सरकारास सदरहू विषयाकडे लक्ष्य देणें भाग पडलें आहे.

३. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा हा, हिंदुस्थानांत कागदी नाणें अस्तित्वांत येण्यापूर्वी ठरलेला असल्यामुळें त्या कायद्याअन्वयें चलनी नोटींचें संरक्षण कोणत्याहि विशेष ठरावांच्या योगानें केलेलें नसून, किंमतीच्या सिक्यूरिटी बनाऊ करण्याच्या गोष्टीस लागू असणाऱ्या सामान्य ठरावांच्या योगानें करण्यांत येतें. परंतु जे दस्तऐवज पैक्याप्रमाणें एकापासून दुसऱ्याकडे जात असून ज्यांचा ऐवज एकंदर चालू नाण्याच्या रकमेचा एक-षष्ठमांश भाग आहे व निदान कधीं कधीं तरी जे अजाण लोकांच्याहि कबजांत जातात ते दस्तऐवज, आणि ज्या इतर किंमतीच्या सिक्यूरिटी नेहमीं वकील लोकांकडून लिहिण्यांत येत असून ज्यांचा संबंध फक्त त्या करून देणाऱ्या मनुष्यांशींच असतो आणि ज्या फक्त कित्येक कायदेशीर रिवाजांप्रमाणेंच तबदील करण्यांत येत असून नेहमीं फक्त वाकबगारांच्याच

कवऱ्यांत येतात त्या सिक्यूरिटी, यांजमध्यें फारच ठळक भेद आहे हें उघड दिसतें. ज्या ठरावांच्या योगानें सदरील दुसऱ्या प्रकारच्या दस्तऐवजांचें संरक्षण प्रशस्तपणें होण्यासारखें आहे ते ठराव सदरील पहिल्या प्रकारच्या दस्तऐवजांचें संरक्षण करण्यास अगदी अपुरते असण्याचा संभव आहे.

४. सदरहू भेद इंग्लंडच्या स्टाट्यूट कायद्यांत मान्य झालेला आहे; त्या कायद्यांत, ब्यांकनोटी (तशाच व्यापारीलोक व पेढीवाले यांच्यामध्यें ब्यांकनोटीप्रमाणेंच बहुतेक हातोहात घोळणाऱ्या इतर कित्येक नोटी व बिलें) बनाऊ करण्याच्या संबंधानें, बनाऊ केलेल्या ब्यांकनोटी जवळ बाळगण्याच्या व चालविण्याच्या संबंधानें आणि ब्यांकनोटी बनाऊ करण्याच्या कामीं वापरण्याच्या इराद्यानें कागद व (कोरलेल्या पत्र्यांसारखीं) हत्यारें बाळगण्याच्या संबंधानें शिक्षेचे विशेष ठराव आहेत. हे ठराव सन १८६१ चा दस्तऐवज बनाऊ करण्यासंबंधी आक्ट (व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या २४ व्या व २५ व्या वर्षांतील च्याप्टर ९८) यांत दाखल केलेले असून ते खालीं सांगितलेल्या अपराधांच्या संबंधाचे आहेत :—

(१) कपट करण्याच्या इराद्यानें ब्यांक नोट बनाऊ करणें किंवा तींत फेरफार करणें, अगर बनाऊ केलेली ब्यांक नोट चालविणें (कलम १२);

(२) बनाऊ केलेली ब्यांक नोट किंवा कोरी ब्यांक नोट कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून विकत घेणें, घेणें, किंवा जवळ बाळगणें; सदरहू अधिकार किंवा सबब असल्याची शाबिती करण्याचा बोजा आरोपी मनुष्यावर आहे (कलम १३);

(३) कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून, ब्यांक नोटींसाठीं वापरण्यांत येतात त्या प्रकारचा वाटरमार्क वगैरेनिशीं कागद तयार करण्याकरितां सांचा वगैरे करणें किंवा जवळ बाळगणें, अगर सदरहू प्रकारचा कागद कागद विकणें किंवा जवळ बाळगणें किंवा त्याची नकल तयार करणें; सदरहू अधिकार किंवा सबब असल्याची शाबिती करण्याचा बोजा आरोपी मनुष्यावर आहे (कलम १४);

(४) कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून, ब्यांकनोटी किंवा कोऱ्या ब्यांकनोटी करण्यासाठीं कोणताहि पत्रा वगैरे कोरणें किंवा जवळ बाळगणें, अगर ज्यावर कोरी ब्यांक-नोट किंवा ब्यांक-नोटीचा भाग छापलेला असेल असा कागद चालविणें किंवा जवळ बाळगणें; सदरहू अधिकार किंवा सबब असल्याची शाबिती करण्याचा बोजा आरोपी मनुष्यावर आहे (कलम १६);

(५) कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून, ब्यांक नोटीच्या कोणत्याहि भागाशीं साम्यता पावणारा एकादा शब्द, नंबर, आंकडा, निशाणी, अक्षर किंवा वेलबुट्टी काढण्याकरितां कोणताहि पत्रा वगैरे कोरणें किंवा जवळ बाळगणें, अगर असा कोणताही ठसा उमटलेला कागद चालविणें किंवा जवळ बाळगणें; सदरहू अधिकार किंवा सबब असल्याची शाबिती करण्याचा बोजा आरोपी मनुष्यावर आहे (कलम १७).

५. हिंदुस्थानांत, चलनी नोटी बनाऊ करण्याबाबतचा चार्ज हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या ४६७ व्या कलमाअन्वयें आणावा लागतो; तशा नोटी चालविण्याबाबतचा चार्ज ४७१ व्या कलमा-अन्वयें आणावा लागतो; आणि नकली पत्रे करण्याबाबतचा किंवा जवळ बाळगण्याबाबतचा चार्ज ४७२ व्या कलमा-अन्वयें आणावा लागतो. दस्तऐवज बनाऊ करण्याच्या संबंधाचे ४६७ व्या कलमाचे ठराव त्याच विषयावरील इंग्लंडच्या कायद्यांतील ठरावांपासून वस्तुतः भिन्न असल्याचें दिसत नाहीं आणि त्यांवरून, साधारणतः, दस्तऐवज बनाऊ करणें व ब्यांकनोटी बनाऊ करणें या दोन्ही गोष्टींची व्यवस्था करण्याचें पुरेसें साधन मिळतें. परंतु इतर कलमें पाहिलीं असतां तीं इंग्लंडच्या कायद्याहून किती कमी स्पष्ट आहेत व त्यामुळें त्यांअन्वयें अपराधाच्या शाबितीचा ठराव होण्यास किती अडचण आहे हें दिसून येतें.

६. उदाहरणार्थ, ४७२ व्या कलमांत असें ठरविलें आहे कीं बनाऊ दस्तऐवज करण्याच्या कारणासाठीं उपयोग करावयाच्या इराद्यानें ठसा उठविण्याकरितां एकादा पत्रा वगैरे तयार करणें किंवा जवळ बाळगणें हा अपराध आहे; परंतु सदरहूप्रमाणें इरादा असणें ही गोष्ट अत्यावश्यक असून तसा इरादा असल्याची शाबिती करण्याचा बोजा फिर्यादी-पक्षावर ठेवला आहे. दुसऱ्या पक्षीं इंग्लंडच्या कायद्यावरून, तेंच कृत्य कायदेशीर अधिकारावांचून किंवा सबबीवांचून करण्यांत आल्यास तें शिक्षेस पात्र केलें आहे, आणि कायदेशीर अधिकार किंवा सबब असल्याची गोष्ट शाबित करण्याचा बोजा फिर्यादीपक्षावर न ठेवतां आरोपी मनुष्यावर ठेवला आहे.

(७) सदरहू गोष्ट या सर्व अपराधांच्या बाबतींत फार महत्वाचा मुद्दा आहे. (प्रत्यक्ष बनाऊ लेख खेरीज करून इतर) प्रत्येक बाबतींत, सदरहूप्रमाणें इरादा असल्याची शाबिती करण्याचा बोजा फिर्यादीपक्षावर न ठेवतां इंग्लंडच्या कायद्याअन्वयें आरोपिताला, तो जें कांहीं करतो त्याबद्दल किंवा तो जें कांहीं आपले जवळ बाळगतो त्याबद्दल त्याला कायदेशीर अधिकार किंवा सबब आहे असें दाखविणें अवश्य आहे. आरोपिताचा इरादा काय असावा त्याबद्दल त्याच्या कृत्यांवरून व अपराध घडल्याच्या हकीकतीवरून कोर्ट बहुतेक प्रसंगीं अनुमान करील यांत संशय नाहीं, तथापि कायदेशीर सबबीच्या संबंधानें शाबिती करण्याचा बोजा इंग्लडांत आरोपितावर टाकलेला आहे, आणि त्या देशांत सदरहूप्रमाणें व्यवस्था असल्यामुळें फिर्यादीपक्षास किती मजबुती येते हें सहज दिसून येईल.

८. आणखी एक भेद आहे, आणि तो बहुतेक सदरीं सांगितलेल्या भेदा इतका महत्वाचा, किंबहुना त्याहिपेक्षां ज्यास्त महत्वाचा, आहे असें दिसतें. हें लक्षांत येईल कीं इंग्लंडच्या कायद्यावरून, "कोऱ्या" ब्यांक नोटी, किंवा एखादी ब्यांक नोट बनाऊ केली असेल तेव्हां तिचा यःकश्चितहि भाग, जवळ बाळगणें ही गोष्ट, आरोपिताकडून कायदेशीर अधिकार किंवा सबब असल्याची शाबिती करण्यांत न येईल तर, शिक्षेस पात्र आहे; परंतु सदरहूप्रमाणें जवळ बाळगणें हा, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा या अन्वयें, अपराध नाहीं, आणि अशा कोऱ्या नोटी किंवा नोटींचे भाग चालवणें किंवा चालविण्याचा प्रयत्न करणें हें (कदाचित् ठकबाजीप्रमाणें किंवा ठकबाजी करण्याचा प्रयत्न करण्याप्रमाणें शिक्षेस पात्र होण्यासारखें आहे तथापि,) बनाऊ लेख करण्यासंबंधी कलमाअन्वयें शिक्षेस पात्र होत नाहीं याचें मुख्य कारण असें दिसतें कीं चलनी नोटींचें संरक्षण केवळ ब्यांच्या बाबतींत लेखावर कोणातरी पक्षकाराची सही होणें हीच कायती मोठी महत्वाची बाब असते तशा किंमतीच्या सिक्युरीटींसंबंधाच्या साधारण कायद्यावरूनच होतें. असा ठराव करण्यात आला आहे कीं "खोटा दस्तऐवज करणें" ह्मणजे ज्या दस्तऐवजावर किंवा त्याच्या भागावर ज्या मनुष्यानें खरोखर आपली सही किंवा मोहर केली नसेल त्या दस्तऐवजावर किंवा भागावर त्या मनुष्याच्या नांवाची सही करणें किंवा त्याच्या मोहरेनें मोहर करणें; व हा ठराव चलनी नोटींस लागू केलेला आहे. यास्तव, चलनी नोट बनाऊ करण्यासाठीं सही बनाऊ करणें अवश्य असतें, व नकली नोटीचा कोणताहि भाग, किंवा जी नोट सहीशिवाय बाकी सर्व बाबतींत नकली असेल तशी सगळी नोट, जवळ बाळगणें हा कोणत्याहि प्रकारचा अपराध होत नाहीं. यामुळें ब्रिटिश हिंदुस्थानच्या कागदी नाण्याची स्थिती भयंकर बनली आहे हें उघड आहे.

९. सदरीं दिलेला मजकूर, चलनी नोटी बनाऊ करण्याची तयारी करणें व त्या करण्याचा प्रयत्न करणें ह्या गोष्टी न होऊं देण्यासंबंधी आहे. परंतु चलनी नोटींप्रमाणें ब्यांक नोटींसाहि सदरहू मसुदा लागू करणें इष्ट वाटलें आहे; कारण ब्यांक नोटींचा बाबत चलनी नोटींपेक्षां जरी कमी महत्वाचा आहे तथापि हिंदुस्थानच्या चलनी नोटींचें ज्या रीतीनें साधाणतः संरक्षण करण्याचें योजिलें आहे त्याच रीतीनें ब्यांक नोटीचें, व मुख्यत्वेंकरून इंग्लंडच्या ब्यांकेच्या नोटींचें संरक्षण, इंग्लंडच्या संयुक्त राज्यांत करण्यांत येतें त्या प्रमाणें, करावें असें हिंदुस्थान सरकारास वाटलें आहे.

१०. सदरहू मसुद्याच्या रकमांच्या संबंधानें आणखी ज्यास्त खुलासा करणें जरूर आहे असें दिसत नाहीं. इंग्लंडच्या कायद्यांतील कोणत्या ठरावांच्या आधारावर २ ऱ्या रकमेवरून हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा यांत दोन कलमें ज्यास्त दाखल करण्याचें योजिलें आहे, ते ठराव त्या कलमांच्या बाजूस रकान्यांत नमूद केले आहेत. कलम ३ यांत, सदरहू दोन कलमांमुळें फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्यांत जी सुधारणूक करणें अवश्य आहे ती दिली आहे.

(सही) जे. वेस्टलण्ड.

तारीख २३ माहे सप्टेंबर, सन १८९८.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरें मुंबई, तारीख २६ माहे आक्टोबर, सन १८९८.

नंबर ६८९३.—हिंदुस्थान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

"होम डिपार्टमेंट.

पब्लिक.

मुक्काम सिमला, तारीख १९ माहे आक्टोबर, सन १८९८.

नंबर २०८४.—सन १८८४चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट (सन १८८४ चा ४था) याच्या ७व्या कलमावरून दिलेला अधिकार चालवून जी कानू करावयाचें योजिलें आहे तिचा खालीं दिलेला मसुदा, सदरहू आक्टाच्या १८ व्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें व हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर १९६४, तारीख २ माहे सेप्टंबर, सन १८८७, यांतील हुकुमांअन्वयें, ज्यांना ती कानू लागू होण्याचा संभव असेल त्या सर्व मनुष्यांच्या माहितीसाठीं, प्रसिद्ध केली आहे, आणि यावरून असें कळविण्यांत येत आहे कीं, सन १८९८ च्या डिसेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेरोजीं किंवा त्या तारखेनंतर सदरहू मसुद्याचा विचार करण्यांत येईल. वर सांगितलेल्या तारखेपूर्वी सदरहू मसुद्याच्या संबंधानें कोणत्याहि मनुष्याकडून कोणतीहि हरकत किंवा सूचना लिहून आली असतां तिचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून विचार करण्यांत येईल.

कानूचा मसुदा.

हिंदुस्थान सरकारचा चीफ् इन्स्पेक्टर ऑफ् एक्सप्लोझिव्ज् हा, ब्रिटिश हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत—

(अ) ज्या कोणत्याहि जागेंत, गाडींत किंवा जहाजांत एकादा बारी पदार्थ, सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट (सन १८८४ चा ४ था) याअन्वयें दिलेल्या लैसेन्सास अनुसरून तयार करण्यांत येत असेल, जवळ बाळगण्यांत येत असेल, वापरण्यांत येत असेल, विकण्यांत येत असेल, स्थलांतर करण्यांत येत असेल किंवा आयात करण्यांत येत असेल, अगर ज्यांत तो त्या आक्टाविरुद्ध किंवा त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंविरुद्ध तयार केला आहे अथवा तयार करण्यांत येत आहे, जवळ बाळगला आहे अथवा जवळ बाळगण्यांत येत आहे, वापरला आहे अथवा वापरण्यांत येत आहे, विकला आहे अथवा विकण्यांत येत आहे, स्थलांतर केला आहे अथवा स्थलांतर करण्यांत येत आहे, किंवा आयात केला आहे अथवा आयात करण्यांत येत आहे असें मानण्यास त्याला कारण असेल त्या जागेंत, गाडींत किंवा जहाजांत शिरण्यास, व ती जागा, गाडी किंवा जहाज तपासून पाहण्यास मुखत्यार आहे;

(ब) त्यांत बारी पदार्थांसाठीं झाडा घेण्यास मुखत्यार आहे;

(क) त्यांत सांपडलेल्या कोणत्याहि बारी पदार्थांचे मासले, किंमत देऊन, घेण्यास मुखत्यार आहे; आणि

(ड) त्यांत सांपडलेल्या ज्या कोणत्याहि बारी पदार्थाच्या संबंधानें सदरहू आक्टाच्या किंवा त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांचें उल्लंघन झालें आहे असें मानण्यास त्याला कारण असेल तो बारी पदार्थ धरण्यास, अटकावून ठेवण्यास, काढून टाकण्यास व जरूर पडल्यास त्याचा नाश करण्यास मुखत्यार आहे.

मात्र असें ठरविलें आहे कीं—

(१) जेव्हां जेव्हां तो असा कोणताहि बारी पदार्थ अटकावून ठेवील किंवा काढून टाकील तेव्हां तेव्हां त्यानें ती गोष्ट जिल्हा माजिस्ट्रेटास कळविली पाहिजे; आणि

(२) त्यानें जिल्हा माजिस्ट्रेटाची पूर्वी मंजुरी घेतल्यावांचून अशा कोणत्याहि बारी पदार्थांचा नाश करतां कामा नये.

(सही) ए. एच्. एल्. फ्रेझर,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

(सही) जे. डब्ल्यू. पी. म्यूर-माकेन्झी,
सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.